**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३०२२ /०२**

**श्री.नरवंदा प्रसाद मिश्रा,**
**राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,**
**नर्मदा कृष्णा भवन, परेरा वाडी,**
**साकीनाका, मुंबई** ------- **अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ - ९ ,बांद्रा (प) मुंबई- ४०० ०५०.**

**जनमाहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस आयुक्त(नियंत्रण कक्ष )**
**पश्चिम प्रादेशिक विभाग, कार्टर रोड,**
**बांद्रा (प) मुंबई- ४०० ०५०.** ------- **उत्तरवादी**

**-विवेचन-**

श्री.नरवंदा प्रसाद मिश्रा,मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दिनांक १३/१०/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीला जनमाहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

चूकीची व अपूर्ण माहिती दिली, प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी दिलेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहिली नाही, त्यांनी जनमाहिती अधिकारी व पोलीस उपनिरीक्षक यांना संरक्षण देण्याच्या / वाचवण्याच्या दृष्टीने आदेश पारित केले. या कारणास्तव अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

उपस्थिताचे म्हणणे ऐकल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

परेरावाडी, साकी नाका मुंबई येथील डिसोझा चाळीमध्ये एकूण १५ खोल्या असून त्यापैकी ३ खोल्यामध्ये राजीव गांधी मेमोरियल हायस्कूलचे वर्ग आहेत.राजीव गांधी मेमोरीयल हायस्कूलचे प्राचार्य श्री.मिश्रा व डिसोझा चाळीच्या मालकाचे जावई श्री. झालके यांचा जागेसंबंधी दिवाणी दावा दाखल आहे. श्री. झालके यांच्या तक्रारीवरून साकी नाका पोलीस स्टेशनमध्ये श्री.मिश्रा यांच्या विरूद्ध गुर क्र २८८/०६ कलम

३४२ अन्वये पोलीसांनी गुन्हा नोंदवला आहे. श्री. मिश्रा यांच्या मते श्री.झालके हेच खरे आरोपी असून त्यांना पोलीसांकडून संरक्षण दिले जात होते. तथापि श्री. मिश्रा यांच्या तक्रारीनुसार नंतर पोलीसांनी श्री.झालके यांच्या विरुद्धही गुन्हा दाखल केला. श्री. मिश्रा यांच्याविरूद्ध नोंदवलेला गुन्हा खोटया तक्रारीवर आधारित असल्यामुळे तो गुन्हा ब वर्गीकृत केला गेला. ब वर्गीकृत केलेला गुन्हयाचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्याची आवश्यकता नाही असे कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि श्री. श्रीकांत बोरसे,सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी दोषारोपपत्र दाखल करण्याचे तोंडी विधीमत/ अभिप्राय दिल्याचे कारण नमूद करून पोलीसांनी श्री.मिश्रा व श्री.झालके या दोघाविरूद्धचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

जनमाहिती अधिका-यांनी साकीनाका पोलीस स्टेशनकडून उपरोक्त गुन्हयाच्या न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्राव्यतिरिक्त इतर सर्व कागदपत्रे अपीलकाराला दिली आहेत.सदर गुन्हयाच्या तपासकामी केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील दिलेला आहे. श्री.मिश्रा यांच्याविरूद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले असल्यामुळे ते त्यांना न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर न्यायालयाच्या परवानगीने देता येईल असे जनमाहिती अधिका-यांनी नमूद केले आहे.व्दितीय अपीलामध्ये अपीलकारावरचे गुन्हयाचे ब वर्गीकृत करण्याबाबत दिलेली चूकीची माहिती व गुन्हा ब वर्गीकृत करण्यासाठीचे नोटींग व प्रोसीडींग च्या प्रती मिळाव्यात हे दोन महत्वाचे मुद्दे आहेत.

एकंदर सर्व प्रकरणाचा साकल्याने विचार करता, गुन्हयाबाबतची कार्यवाहीबाबतची माहिती,गुन्हा ब वर्गीकृत करण्याबाबतची टिप्पणी(टिप्पणी प्रस्तावासह) ही माहिती अपीलकाराला दिलेली आहे. दोषारोपपत्र अर्जदार न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर मिळणार आहे. थोडक्यात मागितलेली माहिती अपीलकाराला मिळालेली आहे व उर्वरित माहिती न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर मिळणार आहे.

मात्र श्री. श्रीकांत बोरसे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अर्जदाराचे विरूद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याचे अभिप्राय दिल्यामुळे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले ही चूकीची माहिती अपीलकाराला देण्यात आली आहे कारण श्री. श्रीकांत बोरसे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उपरोक्त गुन्हयासंदर्भात असा कोणताही तोंडी अभिप्राय पोलीस स्टेशनला दिला नसल्याचे लेखी दिले आहे.

सबब ही चूकीची माहिती दिल्याबद्दल जनमाहिती अधिका-यांनी त्यांच्यावर अधिनियमातील तरतूदीनुसार शास्ती का लादण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आंत पोस्टाने/ हॅंड डिलीव्हरीने व आयोगाकडे दि.३१ डिसेंबर, २००८ रोजी सकाळी ११.०० वाजता व्यक्तिशः येउन खुलासा सादर करावा, असे आदेश देण्यात येत आहेत. दोषारोप पत्रं कोर्टाकडून अर्जदारास मिळेलच. अर्जदाराने

पाठविलेल्या माहितीपैकी जी उर्वरित माहिती अजून दिली नसेल ती ५ दिवसाचे आंत देण्यांत यावी व तसा अहवाल आयोगास पाठवावा.

**निर्णय**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई,**
**दिनांक ०३/१२/२००८**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००८/३४१९/०२

श्री.अरुण शिवाजीराव घाटगे
६/१ घरकूल निवस, १ ला मजला, — अपिलार्थी
एम.डी.केणी मार्ग, भांडूप (पूर्व) मुंबई ४२

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
सहाय्यक पोलिस आयुक्त, प्रादेशिक भिाग
चेंबूर मुंबई ७१

जन माहिती अधिकारी तथा पोलिस उपायुक्त परि-६
चेंबूर मुंबई ७१

*वि वे च न*

श्री. अरुण घाटगे यांनी आयोगाकडे दि.१३.२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.२.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार हे पोलिस विभागातील कर्मचारी असून त्यांना त्यांच्या वेतननिश्चिती विषयी माहिती पाहिजे होती. या संदर्भात अपिलार्थीस माहिती पुरविण्यांत आलेली असून त्यानंतर योग्य कार्यवाही करण्यांत येईल असे कळविण्यांत आलेले आहे.

अपिलार्थीस माहिती जरी देण्यांत आली असली तर अर्जदाराचे समाधान हे त्यांच्या वेतननिश्चिती झाल्यानंतरच त्यांचे समाधान होणार आहे. तरी याबाबत अप्पर पोलिस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष, चेंबूर,मुंबई यांनी लक्ष घालावे. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २ डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००८/३४२१/०२

श्री.अरुण ग.भोवर
रुम ५३२६, अरुण निवास सहकारी संस्था — अपिलार्थी
मर्यादित इमारत क्र.१६७, कन्नमवार नगर नं.१
विक्राळी, पूर्व, मुंबई ८३

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी
सहाय्यक पोलिस आयुक्त, पूर्व प्रादेशिक भिाग
चेंबूर मुंबई ७१

जन माहिती अधिकारी तथा पोलिस उपायुक्त परि-६
चेंबूर मुंबई ७१

*वि वे च न*

श्री. अरुण ग. भोवर व इतर यांनी आयोगाकडे दि.२४.३.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.२.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार श्री. अरुण भोवर यांनी जन माहिती अधिकारी विक्रोळी पोलिस स्टेशन यांचेकडे अर्ज करुन त्यांनी दि.५.१०.२००७, २६.१०.२००७ व २९.१०.२००७ रोजी अरुण निवास सहकारी संस्था मर्यादित यांचे कार्यकारणी विरुध्द तक्रार केली आहे, त्यावर काय कार्यवाही केली यासंबंधी माहिती विचारली आहे. ही माहिती अर्जदारास दि.४.१२.२००७ रोजीच्या पत्राने देण्यांत आली त्याने समाधान न झाल्यामुळे व प्रथम अपिलात अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.१.२००८ रोजीच्या आदेशात आणखी अतिरिक्त

माहिती देण्यांचे आदेशित केलेले आहे. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विक्रोळी पोलिस ठाणे यांनी त्यांच्या दि.१९.२.२००८ रोजीच्या पत्राने अर्जदारास माहिती देण्यासाठी शासकिय माहिती अधिकारी, पूर्व प्रादेशिक विभाग नियंत्रण, चेंबूर यांना पत्र पाठविले त्यानुसार अपिलार्थी यांना दि.११.३.२००८ रोजी माहिती देण्यांत आलेली आहे ती माहिती त्यांनी स्विकारल्याची दिनांक २४.३.२००८ रोजीची स्वाक्षरीही रेकॉर्डला आहे. अमुक एकाच पध्दतीने एखादया विभागाने कार्यवाही करावी, असा आग्रह अर्जदारास धरता येणार नाही. माहितीच्या अधिकारामध्ये जशी माहिती रेकॉर्डला उपलब्ध असेल ती माहिती दिली जात असते. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००८/३४०६/०२

श्री. मनोज डी.रणदिवे
एफ/१६, गुरुपुष्यामृत को.ऑप हौ.सो. अपिलाथी
९० फूट रोड, मुलूंड (पूर्व)मुंबई ४०० ०८१

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव) उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका
पूर्व उपनगरे, राज लिगसी जवळ,
पेपर मिल कपाऊंड

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)
बृहन्मुंबई महानगरपालिका
पूर्व उपनगरे, राज लिगसी जवळ,
पेपर मिल कपाऊंड

## *वि वे च न*

श्री. मनोज डी.रणदिवे, मुलूंड (पूर्व) यांनी आयोगाकडे दि.१०.३.२००८ रोजीचे व्दितीय अपिल सादर केले. त्या अपिलाची सुनावणी दिनांक ३.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी आले होते परंतू त्यांना दुस-या कोर्टात काम असल्याने ते सुनावणीच्या वेळेला उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)मुंबई हे उपस्थित होते. अर्जदाराचे अपिलातील मुद्दे व त्यावरील अपिलीय अधिका-याचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

| | मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| 1) | The appellant by application dated11.12.2007, had demanded information from Public Information Officer (PIO) e.g. (A) copy of various documents granted by BMC to the | The contains of the applicant stating that "reply is given to him with malafide intention and suppressed the facts and granted incorrect and / or misleading information is not correct no acceptable." |

| | | |
|---|---|---|
| | M/s.Ashish Builder & Co. and Gurupushyamruit C.H.S. (B) Deservation of plots and gardens in Mulund (E) legality about building in 'T'Ward and / or Mulund (D) How access granted to Developer and Builder by destroying garden (E). The detail Information about reserved land in Mulund. Accordingly PIO given reply dated 08.01.2008 to the appellant with malafide intention and concealed and suppressed information and granted only incorrect and / or misleading information and destroyed information which is subject matter of the appellant's application and suppressed the fact and material of the case with malafide intentions. | The file papers related to plot bearing Survey No.135 (A) H.No.1(Pt) & CTS No.872 & 872/1-10 of Mulund (E) of M/s. Ashish Builder are not available in this office. However, copies of the documents required by the applicant have been collected from the concerned Architect which will be made available to the applicant. As regards documents of Guru Pushyamruit C.H.S. Ltd. of Land bearing Survey No.59 C.T.S. No.203 of Mulund (E), appellant was informed to give necessary details such as file No. and name of the Architect etc. However the name of the Architect given by the appellant is not correct. Hence necessary information cannot be made available. As other points are pertaining to Ch.E.(D.P.) and Asstt. Comm. 'T' Ward for giving necessary information to the applicant. |
| 2) | The appellant accordingly filed first appeal before the appellate authority (AA) dated 23.01.2008 (Annexed hereto EX – A). Thereafter appellant received one totally irrelevant letter dated 21.04.2008 (EX-B) from the Chief Engineer (Development Plan) with regard, points C and H of appellant's application. The aforesaid letter is deliberately silent about how B.M.C. illegally destroyed and granted access to Manisha Developers. | As per the provision of the Act, information is to be supplied to the applicant in the form of documents as available / maintained in the office. It appears that Ch.E.(D.P.) has replied the appellant on 21.01.200. It is felt that, it is not necessary to give the reasons for granting of access by MCGM to M/s. Manisha Developers as per the Act. Under the circumstances to say that PIO has cheated the applicant with the help of their |

| | | |
|---|---|---|
| | Now it is crystal clear that PIO with the help of their colleague cheated appellant and refused to give information to the appellant. | colleagues and refused to give necessary information is not correct and not acceptable. |
| 3) | On 08.02.2008, AA Mr.A.D.Manohar, heard appellant and PIO. At the time of hearing Mr.Manohar, was defending their colleague i.e.PIO Mr.V.D.Ingavle. The appellant realized the fact that AA, would neither direct to PIO, to grant documents to the appellant not take any action against PIO who deliberately failed to take perform their obligatory duties and refused to give documents to the appellant. The appellant on 19.02.2008, received order dated 16.02.2008 from AA Mr.Manohar who disposed off appeal. The aforesaid order of AA is totally illegal bad-in-law and without application of mind as well as repetition of PIO's order. The AA could have re appeal properly and put the order (Ex-C). But they have willfully not done so and protected their PIO and disposed of appeal with malafide intentions. Thereafter appellant has approached this authority for justice which refused by AA, Mr. A.D.Manohar. | The statement of the applicant stating that appellant authority could not have read the appeal properly and passed the orders by disposing the appeal with malafide intention is not correct and not acceptable. The appellant Shri.Manoj D.Randive is already heard by the undersigned on 08.02.2008 and passed the order with due care. |
| 4) | The appellant submits that in the present case PIO Mr.Ingavale and AA. Mr. Manohar are hard-in-glore and abetting Corruption. The appellant on | The allegations made by the applicant can not be accepted as an evidence from the report and available documents were already given to the applicant. It may |

| | | |
|---|---|---|
| | 33.02.2008 received four documents from AA which enclosed herewith (Ex-D) are neither relevant nor readable. Now it is crystal clear that AA also cheated appellant and protected their PIO. The AA has suppressed appellants case and deliberately allowed corruption to prevail over rule of law. Therefore, appellant prays that to grant this appeal with exemplary penalty and / or cost. If this appeal not granted hardship will cause to the appellant. | further be pointed out that though the file papers related to plot bearing Survey No. 135 (A) H.No.1 (Pt) & CTS No.872 & 872/1-10 of Mulund (E), the efforts were made by the office staff to collect the documents from the Architect and the same are ready with this office. These documents will be furnished to the applicant whenever asked for. Thus it can be concluded that the PIO and appellant are not hand in glove as alleged by the applicant. |

**अर्जदाराला त्या बांधकामाच्या प्रस्तावाबाबतची माहिती पाहिजे आहे. ती फाईल उपलब्ध नसल्यामुळे आर्किटेक्ट कडून पेपर्स प्राप्त करुन घेऊन अर्जदारास संबंधित हवे असलेले डॉक्यूमेंट देण्यांत येतील असे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. दुस-या बांधकामाबाबतची आर्किटेक्टसंबंधी अचुक माहिती अर्जदाराकडून मिळाल्यानंतर ती संबंधित आर्किटेक्टकडून घेऊन अर्जदारास पुरविण्याचे प्रयत्न केले जातील, असेही जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक ३ डिसेंबर २००८** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००८/३४०७/०२

श्री. एस.एस.मुर्ती
२२, रवी किरण हौ ऑ.हॉ.सोसायटी,. — अपिलार्थी
ओशीवरा पार्क, न्यू लिंक रोड, आदर्श नगर,
जोगेश्वरी (प) मंबई ४०० १०२

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा पोलिस उपआयुक्त — उत्तरवादी
मुख्यालय,-१
पोलिस आयुक्तालय, क्रॉफर्ड मार्केट समोर
डी.एन.रोड,मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त
मुख्यालय,-१
पोलिस आयुक्तालय, क्रॉफर्ड मार्केट समोर
डी.एन.रोड,मुंबई ४०० ००१

## *वि वे च न*

श्री. एस.एस.मुर्ती, जोगेश्वरी, मुंबई यांनी आयोगाकडे दि.६.६.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केलेले आहे. त्या अपीलाची सुनावणी दिनांक ४.१२.२००८ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराच्या दि.७.९.२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना सादर केलेल्या मुळ अर्जामध्ये अर्जदाराने त्यांच्या मुलीच्या पासपोर्ट ॲप्लीकेशनच्या संबंधीच्या व्हेरीफिकेशनच्या बाबतीत काही मुद्दयांवर माहिती मागविली होती.

सुनावणीच्या वेळेला अर्जदार उपस्थित नसल्यामुळे त्यांचा अपील मेमो विचारात घेण्यांत आला. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या अपिलाबाबत अर्जदाराने उपस्थित केलेल्या मुद्दयांवर खुलासा पुढीलप्रमाणे सादर केलेला आहे.

अर्जदार श्री.एस.एस.मुर्ती यांनी दि.७.९.२००७ रोजी माहिती अधिकारांतर्गत शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (१)विशेष शाखा-२

गु.अ.विभाग, मुंबई  यांचेकडे अर्ज करुन त्यांची मुलगी नामे वसंतमेघना मूर्ती हिच्या पारपत्र अर्जाच्या पोलिस पडताळणीची माहितीची मागणी केली होती.

अर्जदाराने माहितीच्या अधिकारांतर्गत मुलीच्या पारपत्राच्या पोलीस पडताळणीचे माहितीची मागणी केलेली असल्याने व केंद्रिय माहिती अधिनियम २००५ चे कलम २४ चे उपकलम ४ सह शासकीय  नोटीफिकेशन न. सीआरआयटी/२००५/सीआर २६५/०५/०५ दिनांक ११ ऑक्टोबर २००५ अन्वये अशी पोलीस पडताळणीची माहिती देण्यापासून विशेष शाखा-२ गु.अ.विभाग,मुंबई या शाखेस सूट असल्याने त्याप्रमाणे अर्जदार यांना शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (१) विशेष शाखा-२ गु.अ.विभाग,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.२७४३/सपोआ/विशा-२/गुअवि/२००७ दि.१.१०.२००७ अन्वये अर्जदारास कळविलेले आहे.

त्यानंतर अर्जदार श्री. एस.एस.मुर्ती यांनी दिनांक ७.९.२००७ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपिल अर्ज सादर केला. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या परवानगीने त्यांच्या अनुपस्थितीत दि.१४.११.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीत सुनावणी घेण्यांत आली. सदर सुनावणीचे आदेश पुढीलप्रमाणे आहेत.

" शासकीय माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहेकी, अर्जदाराच्या मुलीच्या परपत्राच्या पोलिस पडताळणी अहवालासाठी संबंधित पोलिस ठाण्याच्या पोलिस अधिका-यानी त्यांच्या निवासस्थनी दोन वेळा भेट दिली असता तयांना अर्जदारानीत्यांची मुलीगी ही दिल्ली येथे परिक्षेकरिता गेली असल्याबाबत कळविले होते. तेव्हा पोलिसांनी अर्जदारांना त्याचे मुलीस पोलिस पडताळणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे घेऊन समक्ष हजर रहाणे आवश्यक असल्याचे सांगून वारंवार कळवूनही अर्जदारयांची मुलगी समक्ष पोलिस पडताळणीसाठी हजर न राहिल्याने व पडताळणीसंबंधी कागदपत्रे सादर न केल्याने अर्जदाराचे मुलीस पारपत्र देण्यास हरकत असल्याबाबतचा अहवाल पारपत्र शाखेस पाठविला त्याचेअनुषंगाने अर्जदाराचे मुलीस पारपत्र देण्यास स्थानिक पोलिस ठाण्याची हरकत असल्याबातचा अहवाल क्षेत्रीय परपत्र कार्यालय,वरळी, मुंबई यांचेकडे पारपत्र शाखा, वि.शा.२ गुअवि,मुंबई यांचाजा.क्र.एनआर नं.१०५६/०७ दि.२६.६.२००७  अन्वये सादर करण्यांत आलेला होता. त्याप्रमाणे अर्जदार यांना समक्ष सांगून अर्जदाराचे मुलीस परत समक्ष क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी, मुंबई या ठिकाणी परत जाऊन रितसर वैयक्तिक विवरणपत्र पुन्हा  सादर करणे आवश्यक असल्याबाबत सांगितले.

शासकिय माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद योग्य असल्याने त्याप्रमाणे अर्जदार यांनी क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी,मुंबई यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी संपर्क साधवा." असे आदेश देऊन अपिलीय प्राधिकारी यांनी सदरचे अपिली निकाली काढलेले होते.

अर्जदार श्री.एस.एस.मुर्ती यांनी व्दितीय अपील अर्जात खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

मुद्दा क्रमांक.१- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४ उपकलम २४ अन्वये नाकारण्यांत आलेली माहिती अन्यायकारक आहे व सदर प्रकरणात माहिती अधिकारी प्रथम अपिलीय प्राधिकारी व पोलिस महासंचालक यांचेकडून कोणतेही सहाय्य मिळालेले नाही.

खुलासा - अर्जदार यांनी उपस्थित केलेला मुददा क्र.१ वर सविस्तर खुलासा खालीलप्रमाणे सादर आहे.

अर्जदार याचे मूलीने भारतीय पारपत्र मिळणेसाठी पारपत्र फाईल क्र. ई-००२१२९/०७ अन्वये दिनांक २४.१.२००७ रोजी क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी, मुंबई या ठिकाणी अर्ज सादर केला. सदरचा अर्ज पोलिस पडताळीणसाठी दि.२९.१.२००७ रोजी पारपत्र शाखा, विशा-२ मुअवि, मुंबई यांचेकडे प्राप्त झाला. त्यामध्ये अर्जदार यांचे मुलीने सध्याचा निवासी पत्ता ४ टाईप-४ टेलेकॉम कॉम्पलेक्स सी.टी.ओ.कपाऊंड, जुहू रोड, सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे पाठविण्यांत आला. सांताक्रुझ पोलीस ठाण्यामार्फत पडताळणीमध्ये अर्जदाराची मुलगी नमूद पत्त्यावर रहात नसल्याचे आढळून आल्याने त्याप्रमाणे पारपत्र अर्जदार रहात नसल्याने हरकत असल्याबाबतचा अहवाल सांताक्रुझ पोलिस ठाण्याचा जा.क्र.३१६०/०७, दि.५.४.२००७ अन्वये पारपत्र शाखेस पाठविला. त्यास अनुसरुन पारपत्र शाखा विशा-२ येथून पारपत्र अर्जदारास पारपत्र देण्यास हरकत असल्याबाबतचा अहवाल जा.क्र.ई-७४९९/एफआर/विशा-२/गुआवि/०७, दिनांक १२.४.२००७ अन्वये क्षेत्रिय पारपत्र कार्यालय, वरळी,मुंबई यांचेकडे सादर करण्यांत आला.

त्यानंतर पारपत्र अर्जदार मुलीने त्याच फाईल क्रमांकावर पुन्हा क्षेत्रिय पारपत्र कार्यालय, वरळी,मुंबई येथे पी.पी. फार्म भरुन केलेला अर्ज दिनांक ३०.४.२००७ रोजी पारपत्र शाखा, विशा-२ येथे प्राप्त झाला त्यामध्ये पारपत्र अर्जदार हिने सध्याचा निवासी पत्ता २२, रविकिरण को.ओ.हौ.सो. ओशिवरा पार्क, आदर्श नगर, जोगेश्वरी (पश्चिम)मुंबई-१०२ असा नमूद केल्याने सदरचा अर्ज पडताळणीसाठी ओशिवरा पोलिस ठाणे येी पाठविण्यांत आला. ओशिवरा पोलिस ठाण्यामार्फत पडताळणीसाठी पारपत्र अर्जदार हिने नमूद केलेल्या पत्त्यावर जाऊन चौकशी केली असता पारपत्र अर्जदार या दिल्ली येथे गेल्याबाबत पारपत्र अर्जदार मुलीचे वडील अर्जदार एस.एस.मुर्ती यांनी सांगितले. त्याना ओशिवरा पोलिस ठाण्याचे पडताळणी अंमलदार यांनी पडताळणीकामी संबंधित कागदपत्रे घेऊन पारपत्र अर्जदार मूलगी हजर असणे आवश्यक असल्याबाबत वेळोवेळी सांगूनही व पोलिस ठाणेस पडताळणीसाठी अर्ज प्राप्त होऊन जवळ जवळ दिड महिन्याचा कालावधी जाऊनही पारपत्र अर्जदार मुलगी आवश्यक कागदपत्रासह ओशिवरङ्गिं पोलिस ठाण्यास हजर राहिली नाही. म्हणून ओशिवरा पोलिस ठाण्याने पारपत्र अर्जदार या आवश्यक कागदपत्रासह पडताळणीकामी उपस्थित रहात नसल्यामुळे हरकत असल्याबाबत त्याचा अहवाल जा.क्र.३५९१/०७ दि.२९.६.२००७ अन्वये पारपत्र शाखेस पाठविला. त्या अनुसरुन

पारपत्र शाखा, विशा-२ येथून पारपत्र अर्जदारास पारपत्र देण्यास हरकत असल्याबाबतचा अहवाल पी.एन.आर.क्र.ई-१०५६/विशा-२/गुअवि/०७ दिनांक २६.६.२००७ अन्वये क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी,मुंबई यांचेकडे सादर करण्यांत आला.

पारपत्र अर्जदार मुलीने दोन वेळा क्षेत्रिय पारपत्र कार्यालयास सादर केलेल्या अर्जानुसार त्याबाबतचा पडताळणी अहवाल क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी,मुंबई येथे सादर करण्यांत आलेला होता. त्यामुळे नियमानुसार पारपत्र अर्जदार मुलीस परत क्षेंत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी,मुंबई येथे जाऊन नविन पी.पी.फार्म भरणे आवश्यक होते. एकदा एका अर्जाच्या संदर्भात अहवाल पाठविल्यानंतर पुन्हा क्षेत्रिय पारपत्र कार्यालयाकडून अर्ज प्राप्त झाल्याशिवाय फेर अहवाल पाठविता येत नसल्यामुळे पारपत्र अर्जदार मुलीने तेथे नवीन पी.पी.फार्म भरणे आवश्यक होते. परंतू तसा फार्म तिने भरलेला नाही त्याऐवजी आवश्यक त्या कागदपत्राची कागदपत्राची व नविन फार्मची पूर्तता न करताच अर्जदारश्री.एस.एस.मुर्ती यांनी माहिती अधिकारांतर्गत शासकीय माहिती अधिकारी वि.शा.२ गु.अ.वि.मुंबई यांचेकडे अर्ज सादर केला. त्यासमाहिती अधिकारी यांनी वेळेत उत्तर दिलेले आहे. त्यावर अर्जदार यांनी अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपिल अर्ज सादर केला. सदर अर्जाचे सुनावणीकामी अर्जदार हे समक्ष हजर राहिले नाहीत. तरीही अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अर्जाची सुनावणी घेऊन शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलस आयुक्त (१)विशा-२ गुअवि,मुंबई यांनी सादर केलेली माहिती योग्य असल्याची खात्री केल्यानंतरच अर्जदार यांना क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी यांचेशी संपर्क साधण्याबाबत कहवून त्याचा अपिल अर्ज निकाली काढलेला आहे.

त्यानंतर अर्जदार श्री.एस.एस.मुर्ती यांनी मा.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे अर्ज सादर केला. सदरचा अर्ज दिनांक १८.१.२००८ रोजी पारपत्र शाखा, विशा-२, गुअवि, मुंबई यांचेकडे प्राप्त झाला. त्याप्रमाणे मा.उपसहाय्यक पोलिस महानिरिक्षक (विशा) पोलिस महासंचालकांचे कार्यालय,मुंबई यांना जा.क्र.२७६/पारपत्र/विशा-२/०८ दिनांक २२.१.२००८ अन्वये लेख्ी पत्रान्वये उत्तर पाठविण्यांत आलेले आहे.

वरील मुद्दे विचारात घेता, अर्जदार यांना माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व पोलिस महासंचालक यांचेकडून कोणतेही सहाय्य मिळाले नाही हे म्हणणे सुयक्तिक दिसून येत नाही.

मुद्दा.क्र.२- माहिती अधिका-यानी चुकीची माहिती देणे, स्पष्ट माहिती न देणे या आधारे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी चुकीचे अनुमान करुन निर्णय दिला.

खुलासा - अर्जदार यांनी उपस्थित केल्याप्रमाणे माहिती अधिका-यांनी त्यांना कोणतीही चुकीची माहिती दिलेली नाही. तसेच माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतेही चुकीचे अनुमान करुन निर्णय दिलेला नाही. याबाबत नमूद करणे आवश्यक वाटते की, पोलिस पडताळणी करताना पारपत्र अर्जदार हे त्यांनी

त्यांचे पारपत्र अर्जात नमूद केलेल्या वर्तमान पत्त्यावर वास्तव्यास आहेत की नाहीत व असल्यास वास्तव्याचा कालावधी  याबाबतचा अहवाल पाठविणे आवश्यक आहे. तसेच पारपत्र अर्जदार यांनी पडताळणीकामी स्वत: आवश्यक ते कागदपत्र व स्वत:चे पासपोर्ट साईज फोटोग्राफ घेऊन समक्ष पोलिस ठाणे येथे हजर रहाणे आवश्यक आहे.  अर्जदार यांचे पारपत्र अर्जदार मुलीने भरलेल्या पहिल्या अर्जाचे पडताळणीचे वेळेस अर्जदार यांनी त्याचा पारपत्र अर्जात दिलेला पत्ता बदललेला होता.  त्यामुळे साताक्रुझ पोलिस ठाण्याने पारपत्र अर्जदार नमूद पत्त्यावर रहात नसल्याने हरकतीचा अहवाल सादर केलेला आहे.  सदरची बाब ही अर्जदार यांनी देखील त्याचे अर्जामध्ये मान्य केलेली आहे.  त्यानंतर पारपत्र अर्जदार मुलीने परत भरलेल्या रि-ओपन अर्जाचे पडताळणीचे वेळेस पारपत्र  अर्जदार मुलगी ही अर्जात दिलेल्या पत्त्यावर कळवूनही दिड महिन्याचे कालावधीत समक्ष आवश्यक कागदपत्रासह  ओशिवरा पोलिस ठाणे येथे हजर न राहिल्याने ओशीवरा पोलिस ठाण्याचे हरकतीचा अहवाल सादर केलेला आहे.

सदरची वस्तुस्थिती अर्जदार यांना पारपत्र शाखा विशा-२ गु.अ.वि.मुंबई येथे समक्ष चौकशीसाठी आल्यानंतर सविस्तर पणे सांगून त्यांना त्याचे मुलीसह क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी,मुंबई येथे जाऊन नविन पी.पी.फार्म भरल्यानंतरच त्याचे मुलीचे पारपत्र अर्जाची  फेरपडताळणी करणे शक्य होऊ शकेल याची स्पष्ट कल्पना देण्यांत आलेली होती. परंतू अर्जदार एस.एस.मूर्ती यांना परत  क्षेत्रिय पारपत्र कार्यालय,वरळी, मुंबई येथे जाऊन नविन फार्म भरणे मान्य नव्हते.  त्यांनी  पूर्वीच भरलेल्या फार्मवर पोलिसानी पडताळणी अहवाल सादर करावा असा आग्रह होता व सदरची बाब ही पारपत्र पडताळणी प्रक्रियेच्या विरुध्द आहे. त्याबाबत अर्जदार मूर्ती यांना स्पष्ट कल्पना देण्यांत आलेली आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येईल की, अर्जदारास त्यांच्या मुलीच्या पासपोर्टसंबंधीचे व्हेरिफिकेशन बाबत योग्यती माहिती व मार्गदर्शन करण्यांत आलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक  ४ डिसेंबर  २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४३३ /०२

श्री.चिमणलाल सिंधुमल मेघराजानी
सी-१ अमोद को.ऑ.हॉ.सोसायटी ,
व्ही.बी.फडके मार्ग, मुलूंड (पूर्व),मुंबई ८१

------- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था (२)मुंबई कोकण भवन, दुसरा मजला,
नवी मुंबई ३४००६१४ सी.बी.डी.बेलापूर

जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था
टी विभाग ,मुलूंड कार्यालय, जे.एस. डोसा मार्ग,
मुलूंड (पू) मुंबई ८०

------- उत्तरवादी

-विवेचन-

श्री. चिमणलाल मेघराजानी यांनी आयोगाकडे दि.३०.३.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलाची सुनावणी दि.४.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास त्यांच्या अमोद को.ऑप.हौ.सोसायटीच्या काही रेझोल्यूशनच्या प्रती पाहिजे होत्या व त्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय, टी-वॉर्ड यांच्याकडे अर्ज केला होता. परंतू सदरील माहिती ही गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या कार्यालयाच्या स्तरावरील असल्यामुळे व अर्जदार उपनिबंधकाकडे मागत असलेली माहिती उपनिबंधक कार्यालय यांच्याकडील नसल्यामुळे महाराष्ट्र सहकारी कायदयातंर्गत उपनिबंधकानी संबंधित सोसायटीच्या सचिवाना सदरील माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहेत. तरीही ती माहिती अर्जदारास उपलब्ध झालेली नाही.

सहकार आयुक्त, सहकारी संस्था यांनी त्यांच्याकडील परिपत्रक दि.८ फेब्रुवारी २००६ रोजीच्या परिपत्रकान्वये ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकिय विभागाकडून भरीव अर्थसहाय्य उपलब्ध झालेले नाही, अशा संस्थांना "माहिती अधिकार कायदा" लागू होत नाही, असे निर्देश दिले आहेत. नुकतेच कर्नाटक हायकोर्टाने सुध्दा दिलेल्या निर्णयात "वरील प्रकारची भूमिका योग्यच आहे" असाच निर्णय दिलेला आहे. मात्र अर्जदारांची माहितीची गरज सहकारी कायद्यातंर्गत भागण्याच्या दृष्टीने अर्जदाराने आजच दुपारी ३.०० वाजता उपनिबंधक कार्यालयात जाऊन त्यांना हव्या असणा-या माहिती बाबत चर्चा करुन व संबंधित संस्थेच्या सचिवाना आवश्यकता भासल्यास पाचरण करुन बोलावून घेऊन अर्जदारास उपलब्ध करुन देण्याचे उपनिबंधक यांनी मान्य केले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ४ डिसेंबर २००८

FILENAME \p E:\My Documents\December-2008.doc

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४३४ /०२

श्री.रमेश एस.मिरचंदानी
३३१, शहानी कॉलनी, नवघर रोड,
मुलंड (पूर्व),मुंबई ८१

--- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय -- उत्तरवादी
धर्मादाय भवन, ३ रा मजला ८३ डॉ.ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई -१८

**-विवेचन-**

श्री. रमेश मिरचंदानी, मुलूंड यांनी आयोगाकडे दि.३१.३.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.४.१२.२००८रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते..

अर्जदाराने थ्रोडोमल मस्कतराम ज्योतसिंग ॲन्ड शहानी ट्रस्टच्या संदर्भात काही माहिती विचारली होती. त्याबाबत प्रथम अपिलाच्या आदेशात प्रथम अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपआयुक्त यांनी प्रत्येक मुद्यांचा योग्य परामर्श घेतलेला आहे. अर्जदाराने मागितलेल्या ११ मुद्दयापैकी काही मुद्दयाची माहिती ही बृहन्मुंबईच्या विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध असल्यामुळे त्याबाबतीत त्यांचेकडे अर्ज पाठविला. मुद्दा क्र.३ ते ७ ची माहिती देण्यांत आलेली आहे. मुद्दा क्र. ८ ते ११ मुद्दयाबाबतची माहिती उपलब्ध असलेले डॉक्यूमेंट अर्जदारानी तपासून त्यांनी निवड केलेली कागदपत्रे त्यांना देण्यात येतील असे असे नमूद करण्यांत आलेले आहे.

अपिलार्थीस दिलेली माहिती खोटी आहे असे त्याचे प्रतिपादन आहे पण त्याबाबत कुठलेही विवेचन दिलेले नाही. अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलीय आदेशात जन

माहिती अधिकारी यांना ॲड.हिंग्रॉनी ॲड. श्री. डी.एस. चंददानी यांनी दिलेल्या नोटीसेसबाबतीत चॅरिटी कमिशनर कार्यालयास प्राप्त झाल्यास त्या नोटीसीच्या प्रती अर्जदारास देण्यांत यावी असेही निर्देश अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहेत. याबाबत अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशात कुठलाही बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आ दे श**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ४ डिसेंबर २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४४९ /०२

श्री.विनायक ना.कोळी,
१६८/जी, पहिला मजला, धारावी कोळीवाडा,
मुंबई ४०० ०१७

------- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षक भूमि अभिलेख,
मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत,
१० वा मजला, बांद्रा (पूर्व)मुंबई ४०० ०५१

जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, मालाड
प्रशासकिय इमारत, ०५ वा माळा,
बोरीवली, मुंबई

------- उत्तरवादी

-विवेचन-

श्री. विनायक ना. कोळी, मुंबई यांनी आयोगाकडे दि.११.४.२००८ रोजी जे व्दितीय अपील आयोगाकडे केले त्या अपीलाची सुनावणी दि.५.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

नगर भूमापन, मालाड यांचे कार्यालय, अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांच्याकडे दि.७.७.१९९८ रोजीच्या आदेशान्वये नगर भूमापन मालाड येथील चौकशी नोंदवही क्र.६७ मधील आलेख क्र.६९ वरील क्र.२५ ते नंबर नसलेले व नावे रद्द करण्यांत आल्याचे आदेश देण्यांत आले होते. अर्जदारास यासंबंधीचे त्यांचे आदेश हे अधिक्षक, भूमिअभिलेख यांनी या अगोदरच दिलेले आहेत. व्दितीय अपिलात अपिलार्थी यांनी जी मागणी केलेली माहिती आहे ती पुढीलप्रमाणे आहे.

आपल्या कार्यालयातील नोंदणी प्रमाणे मंगुल केणी यांच्याकडील दस्तऐवज सुड कमी जास्त पत्रक दिनांक १९१८ चे सर्व्हे क्र.२७१हे मोडी अक्षरामध्ये आमच्याकडे आहे. आपल्या कार्यालयातील चौकशी नोंदवहीतील नोंद मंगुल केणी यांच्या नावाची आहे. यावरुन स्पष्ट दिसून येते की, सदर जमिनीचे मालक मंगुल केणीच आहे असे नोंदीवरुन स्पष्ट होत आहे.

आपल्या कार्यालयातील अभिलेखाच्या प्रती अन्वये मंगुल केणी यांची नोंद पुन्हा आपल्या अभिलेखावर नोंद घ्यावी, असे आदेश मा.तहसिलदार बोरीवली यांना देण्यांत यावेत.

सदर नोंदीच्या वेळी १९६६ च्या अन्वये कलम सर्व्हे क्रमांक २७१,५०४ धारकांच्या नावाची नोंद पी.आर.कार्डामध्ये घेण्यास चुकून राहिले असले तर अधिक्षक मालाड यांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २८७ अन्वये कलम २८२, कलम २८२ अन्वये घ्यावयाच्या नोंदी दुरुस्त करता येतात तसेच नवीन नोंदी देखील घेण्याची तरतूद आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या अर्जान्वये व सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने भु.क्र.२७१ व नवीन भु.क्र.५०४ व न.भु.क्र.१४०६ खाली स्वतंत्र नोंद घेण्यांत यावी. मंगुल केणी यांच्या वारसांची नांवे-

१ . जनाबाई खंडेराव केणी

२. जयवंत खंडेराव केणी

३. मंदा खंडेराव केणी

४. शुभांगी खंडेराव केणी

५. किशोर खंडेराव केणी

वरील वारसांतर्फे मुखत्यारधारक म्हणून श्री. विनायक ना. कोळी म्हणून नोंद घेण्यांत यावी,असे आदेश मा.तहसिलदार-बोरीवली यांना देण्याची कृपा करावी.

वरील विनंतीवरुन रेकॉर्ड मधील नोंदी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली बदलून मिळतील अशी अपिलार्थीची समजूत असेल तर ती चुकीची आहे, असे अपिलार्थींना

सुनावणीच्या वेळी सांगण्यांत आले. तरी दि.७.७.१९९८ चे आदेश मान्य नसतील तर अधिक्षक, अभिलेख दि.२६.२.२००८ रोजीच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कायदयातंर्गत कलम २४७ अन्वये उपसंचालक, भूमी अर्जदारांना अभिलेख कोकण प्रादेशिक कार्यालय,नवी मंबई यांच्याकडे अपिल दाखल करुन त्याचे आदेश प्राप्त करु शकतात. मात्र माहितीचा अधिकार अधिनियमाखाली माहितीतील आदेश बदलून मिळू शकत नाही. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ५ डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४६२ /०२

श्री.प्रकाश भास्कर पगारे
बिल्डिंग अे-२, रुम नं.१२, वरळी, पोलिस वसाहत,
वरळी,मुंबई ४०० ०३०

------- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,
(प्रतिबंधक)
गुन्हे शाखा, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालय,
मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त(गुन्हे )
पोलिस आयुक्त कार्यालय,मुंबई ४०० ०१

------- उत्तरवादी

-विवेचन-

श्री.प्रकाश पगारे यांनी आयोगाकडे दि.११.६.२००८ रोजी जे अपील दाखल केले होते. त्या अपीलाची सुनावणी दि.६.१२.२००८ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार यांनी श्री. उत्तम गौड, प्रशासकीय अधिकारी गुन्हे शाखा, मुंबई यांच्या भ्रष्टाचार व गैरकारभाराविरुध्द जे अर्ज करण्यांत आलेले आहेत त्याबाबत कार्यवाही करण्यांत आलेली आहे तसेच श्री.गौण यांचे विरुध्द एकूण किती तक्रार अर्ज आलेले आहेत व त्यावर काय कार्यवाही करण्यांत आलेली आहे, याची माहिती विचारली होती. अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२.४.२००८ रोजी रेकॉर्डला असलेली सर्व माहिती अर्जदारास देण्यांत यावी असे निर्देश दिलेले आहेत व त्याचप्रमाणे त्याचदिवशी अर्जदारास श्री. देशपांडे

यांनी दिलेल्याा अर्जाबाबात श्री.उत्तम गौड  यांना समज देण्यांत आलेली आहे.  दुसरा अर्ज हा खोडसाळपणाने सादर केलेला आहे व श्री.पगारे यांनी दिलेल्या तिस-या तक्रार अर्जाबाबत श्री. गौड यांना नाराजी पत्र देण्यांत आलेले आहे असे कळविण्यांत आलेले आहे. अर्जदाराचे म्हणणे असे होते की, अर्जाबाबत निश्चित माहिती मिळालेली नाही.  संबंधित अधिकारी यांनी काही अर्ज एकत्रित स्वरुपात विचारात घेऊन कार्यवाही केलेली असू शकते.अर्जदार हे पोलिस विभागातील कर्मचारी असल्यामुळे श्री.गौड  यांच्या विरुध्द असलेल्या वेगवेगळया तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची  नस्ती दाखविण्यांत यावी.  जेणेकरुन कोण-कोणत्या अर्जावर कार्यवाही झाली याबाबतची खात्री सुध्दा त्यांना करुन घेता येईल. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक  ६ डिसेंबर  २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४५८ /०२

श्री.देवयानी रामचंद्र सबनीस
५/७०,ज्ञानयोग सो. वजीरा नाकार
एल.टी.रोड, बोरीवली (प)
मुंबई ९१

------- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्याध्यापिका
पूर्णप्रज्ञा हायस्कू, दहिसर (पूर्व),मुंबई ६८

जन माहिती अधिकारी तथा सचिव
पूर्णप्रज्ञा हायस्कू, दहिसर (पूर्व),मुंबई ६८

------- उत्तरवादी

-विवेचन-

श्रीमती डी.आर. सबनीस यांनी दि.२६.५.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्याची सुनावणी दि.६.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व पुर्ण प्रज्ञा संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. शाळेच्या प्राचार्यही काही कारणास्तव सुनावणी च्या वेळी उपस्थित राहू शकल्या नव्हत्या परंतु त्या सुनावणी संपल्यानंतर उपस्थित राहिल्या होत्या.

अर्जदारास शिक्षण विभाग यांच्या दि.१९.११.२००७ रोजी ची ११०४-०५ या आदेशाची प्रत पाहिजे होती व संस्थेचे म्हणणे असे की, हे कागदपत्र शिक्षण विभागाचे असल्याने शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय देऊ शकणार नाही. मात्र श्री.सबनीस यांनी स्वत: शिक्षण विभागाकडून संबंधित प्रत घेतली तर त्यांची हरकत नव्हती. श्रीमती सबनीस या शाळेमध्ये शिक्षण सेवक म्हणून काम करीत आहेत. अर्जदाराला हवी असलेली माहिती माहितीच्या अधिकाराखाली "माहिती" या संज्ञे अंतर्गत येते. त्यात गोपनीय असे काहीही नाही. शिक्षण संस्थेला दुसरीकडून आलेल्या पत्राची प्रत द्यावी किंवा नाही असा संभ्रम असल्यामुळे त्यांनी त्यांना माहिती दिलेली नाही, परंतू असा संभ्रम असण्याचे काही कारण

नाही. त्यामुळे सदरील पत्राची प्रत संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला द्यावी असे निर्देश देण्यांत आलेले आहेत. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

**आ दे श**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ६ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४५६ /०२

श्री. चेतन कोठारी, ५२ ओशियाटिक अपार्टमेंट, ------- अपीलकार
डॉ. राजाभाई पटेल लेन
बी देसाई रोड, मुंबई ४०० ०२६

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त ------- उत्तरवादी
(प्रतिबंधक) यांचे कार्यालय,
गुन्हेशाखा, गुन्हे अण्वेषण विभाग,मुंबई

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्त कार्यालय,बृहन्मुंबई ४०० ००१

-विवेचन-

श्री. चेतन कोठारी यांनी दि.१६.५.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी ६.१२.२००८ रोंजी घेण्यात आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराना cyber crime(ctredit card internet.etc) तसेच इन्फरमेशन टेक्नॉलॉजीअंतर्गत गेल्या पाच वर्षामध्ये नोंदणी केलेल्या केसेसबाबतीत माहिती पाहिजे होती. ही माहिती त्यांना पूर्णपणे न मिळाल्यामुळे तसेच वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे व कोणत्या व्यक्तीविरुध्द केसेस नोंदविण्यांत आलेल्या आहेत याची माहिती न दिल्यामुळे प्रथम अपिल केले होते. त्यावर दि.३१.४.२००८ रोजी निर्णय देताना, या गुन्हयामध्ये १८ वर्षाखालील कोणत्या व्यक्ती आहेत त्यांची नावे सोडून इतर व्यक्तींची नांवे माहिती अर्जदारांना पुरविण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले व त्यानुसार अर्जदारास दि.५.५.२००८ रोजी माहिती देण्यांत आली. ज्यांच्याविरुध्द गुन्हे नोंदविण्यांत आले अशा केसेसची स्थिती दर्शविणारी माहिती देण्यांत आली. तसेच दि.१२.६.२००८ रोजीच्या

पत्रानुसार  गुन्हयाच्या प्रकारानुसार माहिती देणारा तक्ता हा अर्जदारास पाठविण्यांत आला होता. मात्र अर्जदाराने असे सांगितले की, दि.१२.६.२००८ रोजीचे पत्र मिळालेले नाही, ते पत्र त्वरीत देण्याचे निर्देश देण्यांत आले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिका-यांचे नांव व पत्ता माहिती देताना नमूद करावयाचा असतो, याची जाणीव त्यांना करुन देण्यांत येत आहे. तसेच अर्जदाराच्या अर्जाचा परिपूर्ण अभ्यास करुन तुटक तुटक माहिती न देता एकत्रित परिपूर्ण माहिती देण्यासाठी संबंधित अधिका-याला समज देण्यांत येत आहे.  सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक  ६ डिसेंबर  २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४६७ /०२

श्रीमती रत्नमाला सुधाकर काटकर
७/ब सिल्व्हर अपाटमेंट, ------- अपीलकार
ॲनेक्स, दुसरा मजला,
आकुर्ली छेद रस्ता क्र.०१, कांदिवली(पूर्व)
मुंबई १०१

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई ------- उत्तरवादी
पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पूर्व)
मुंबई ४०० ०६०

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई
पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पूर्व)
मुंबई ४०० ०६०

-विवेचन-

श्रीमती रत्नमाला सुधाकर काटकर यांनी आयोगाकडे दि.२८.६.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.८.१२.२००८ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होत्या.

सुनावणीच्या वेळेला जी माहिती विभागाकडे प्रत्यक्ष उपलब्ध होती ती सर्व देण्यांत आलेली आहे, तसा स्पष्ट उल्लेख अपिलीय अधिकारी यांच्या आदेशामध्ये आहे. जी माहिती शाळेकडील आहे ती माहिती आता शाळेकडून प्राप्त करुन घेण्यांत आलेली आहे. तीही माहिती सुनावणीच्यानंतर लगेचच अपिलार्थी यांना देण्यांबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यांत आलेले आहेत. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ८ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४६८ /०२

श्री. रणजीतराय भगवानजी देसाई
५०/४०३, गणेश सदन, ------- अपीलकार
टिळक नगर-३, एम.जी.रोड,
गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त (शिक्षण) ------- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, ३ रा मजला,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय, डॉ.आंबेडकर रोड
परेल, मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका,
प्राथमिक शिक्षण विभाग कार्यालय, हिंदू कॉलनी,
दादर, मुंबई -१४

-विवेचन-

श्री. रणजितराय देसाई, सेवानिवृत्त, चित्रकला शिक्षक यांनी आयोगाकडे दि.२४.६.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.८.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराच्या वेगवेगळया मुद्याबाबतीत जन माहिती अधिकारी पुढील प्रमाणे खुलासा करीत आहेत.

१. अनधिकृत गैरहजेरीचे दिवस कर्तव्यार्थ समजून त्या कालावधीचे वेतनादि फायदे श्री.रणजीत देसाई यांना दिले आहेत. दि.१.१.२००८ रोजीच्या पत्रास उत्तर दिले आहे.

२. प्र.अ.(शा) एच/पूर्व विभाग कार्यालयाशी संबंधित नाही. पान क्र.५,६, सोबत जोडलेले नाही.
३. रोख शुल्क कधीही दिलेले नाही. त्यामुळे स्विकारण्याचा प्रश्नच नाही. दिलेल्या धनादेशात माहिती अधिकारी उल्लेख असल्याने स्विकारता आला नाही. धनादेश म.न.पा. च्या नांवे असणे आवश्यक आहे. म्हणून पोस्टाने परत पाठविला.
४. २०.२.२००८ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने पत्रोत्तर दिले आहे. परंतू एच/पूर्व कार्यालयास टपालखर्च/शुल्क मिळालेले नाही.

**Particulare of Information**

१. दि.१.१.२००८ पासून श्री. देसाई यांनी मागितलेली माहिती वेळोवेळी दिलेली आहे.
२. पृष्ठ क्र.५/६ संदर्भासाठी येथे दिलेले नाही. आजपर्यत श्री.देसाई यांनी मागितलेली माहिती श्रीम.त्रिवेदी प्र.अ.(शा)एच/पूर्व यांनी वेळोवेळी दिली आहे. त्यांच्या स्थळप्रती कार्यालयात आहेत. केव्हाही त्यांना उपलब्ध करुन दिली जाईल. दि.२७.३.२००८ ची माहिती त्यांना दिली आहे.
३. याबाबत प्राथमिक चौकशी होऊन देसाई यांच्या गैरहजरीचे दिवस कर्तव्यार्थ करुन सर्व आर्थिक फायदे देण्यांत आले आहेत.
४. अनुक्रम क्रमांक ४ ते ११ बाबतचे उत्तर वरील क्र.३ मध्येच आहे.
१२. रोख शुल्क कधीही न दिल्याने स्विकारण्याचा प्रश्नच नाही.
१३.प्रास्ताविकातील क्र.३मध्ये उत्तर दिले आहे.
१४.वैयक्तिक मत असल्याने उत्तर नाही.
१५.दि.१३.१.२००८ च्या पत्राला उत्तर दिले आहे. त्यात दि.१३.२.२००८ ची स्वाक्षरी आढळत नाही.
१६. धनादेश योग्य पध्दतीने भरला नसलयाने परत पाठविला.
१७. उपरोक्त १६ अनुसार.
१८. प्र.अ.(शा)एच/पूर्व/ग/ओडी/२५२ दि.१२.३.२००८ अन्वये श्री.देसाई यांना आवश्यक असलेली माहिती TAVO च्या चौकशीअंती देण्यांत आलीहोती.
१९.संदर्भासाठी पृष्ठ क्रमांक ११ सोबत जोडलेले नसल्याने प्राप्त झाले नाही.

अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. सह आयुक्त (शिक्षण)यांनी दि.१५.५.२००८ रोजी जे आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार अर्जदारास हवी असणारी माहिती श्रीम. त्रिवेदी, प्र.अ.शाळा, एच (पूर्व)कार्यालय यांच्याकडे आहे. सह आयुक्त तथा अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती १५

**दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिलेले आहेत. तेव्हा सह आयुक्त, अपिलीय अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येत आहेत की, त्यांनी स्वतःच दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली आहे किंवा नाही, याचा शहानिशा करुन घ्यावा व त्याप्रमाणे त्यांचा अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.**

**आ दे श**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

**दिनांक ८ डिसेंबर २००८** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४५४ /०२

श्री. गुलाम मो.अ.अजीज बनानी ------- अपीलकार
चिराग नगर, पारसीवाडी, यु.पी.रेस्टॉरंट
नजीर तबेलावाला, घाटकोपर (प)मुंबई ८६

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त ------- उत्तरवादी
(प्ररिमंडळ-६) पूर्व प्रादेशिक विभाग,
नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई ७१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त
(प्ररिमंडळ-६) पूर्व प्रादेशिक विभाग,
नियंत्रण कक्ष, चेंबूर, मुंबई ७१

-विवेचन-

श्री. गुलाम मो.अ.अजीज बनानी यांनी आयोगाकडे दि.२२.५.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.५.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास त्यांच्या दि.२०.११.२००७ रोजी केलेल्या कलम ६ च्या अर्जानुसार त्यांच्या विरुध्द खोटया तक्रारी केल्यामुळे शासकिय कर्मचा-याकडून होणा-या मानसिक त्रासाबाबत व शासकिय कर्मचा-याकडून न्याय मिळणेबाबत माहिती पाहिजे होती.

अर्जदारांना दि.२८.१२.२००७ रोजीच्या पत्राने असे कळविण्यांत आले की, त्यांच्या पाहिल्या पत्नी नामे. शमशाद बेगम हिने अर्जदार व दुसरी पत्नी शमिम बानो बनानी यांचेविरुध्द मानसीक व शारीरीक छळ केल्याची तक्रार दिल्याने गु.र.क्र.१४३/०७ कलम ४९८ (अ), ५०६ (२) ३४ भादविप्रमाणे गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली व सदर गुन्हा न्याय प्रविष्ठ आहे. सदरील माहितीने समाधान झालेल्या दाखल केलेल्या प्रथम अपिलात ही माहिती दिलेली असल्यामुळे व अपिल मुदतीत सादर न केल्यामुळे फेटाळून लावण्यांत आलेले आहे.

व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला सुध्दा अपिलकर्त्यास रेकॉर्डप्रमाणे उपलब्ध असलेली योग्यती माहिती दिली असल्याचे आढळून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १० डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४८८ /०२

श्री. गुलाब सहादू पाटील, .----- अपीलकार
३, वसंतपुष्प अपार्टमेंट,
गोविंदनगर, नासिक-९

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस उप आयुक्त(मु) ----- उत्तरवादी
ॲन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य,मुंबई
मधुइंस्ट्रियल इस्टेट १ ला मजला,
पांडूरंग बुधकर मार्ग, लोअर परेल,
मुंबई ४०० ०१३

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य,मुंबई
मधुइंस्ट्रियल इस्टेट १ ला मजला,
पांडूरंग बुधकर मार्ग, लोअर परेल,
मुंबई ४०० ०१३

## -विवेचन-

श्री. गुलाब सहादू पाटील,नासिक यांनी आयोगाकडे दि.१० जुलै २००८ रोजी दाखल केलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दि.१५.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी गैरहजर होते व अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास त्यांच्या विरोधात चौकशी करुन गुन्हा दाखल करण्यांत आला, त्या दाखल करण्यांत आलेल्या गुन्हयाच्या संदर्भात काही माहिती पाहिजे होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२९.३.२००८ रोजीच्या पत्रात अर्जदाराविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यांत आलेले आहे व नमुद गुन्हयातील दोषारोप पत्र, साक्षीदाराचे जबाब, पंचनाम्या संदर्भातील कागदपत्राच्या नकला देण्यांत आलेल्या आहेत. यातून अर्जदारास हवी असलेली माहिती मिळू शकेल असे उत्तर पाठविण्यांत आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.३१.५.२००८ रोजीच्या आदेशाने वरील निर्णय कायम केलेला आहे. सुनावणीच्या वेळेला अपिलार्थी गैरहजर होते.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या मागणीच्या बाबतीत त्यांनी पुढीलप्रमाणे विवेचन केलेले आहे.

" प्राप्त अपीलाच्या संबंधात उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये गुन्हा रजि.क्र.३३/२००२ मधील २७ उमेदवाराचे जबाब सपोआ, स्पेशल सेल, एम.पी.एस.सी. अ‍ॅ.क्र.ब्युरो, म.राज्य, मुंबई यांना ज्या पत्राव्दारे प्राप्त झाले त्या पत्राची प्रत मागितली होती. या संदर्भात माहिती घेता प्रतिवादी यांनी त्यांचे उत्तरात सदर बाब न्याय प्रविष्ठ आहे व वादी यांनी कोर्टात अर्ज सादर केला होता कोर्टाच्या आदेशाप्रमाणे तपासी अधिकारी सपोआपरदेशी यांनी २७ जबाबांच्या प्रति पुरविल्या होत्या. ज्या बबींचा उल्लेख कोर्टाच्या आदेशात नाही व प्रकरण न्यायपविष्ठ आहे. त्यामुळे अधिक कागदपत्रे पुरविल्यास कोर्टाच्या आदेशाशी विसंगत होईल. तसेच प्रतिवादी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (बी) अन्वये सदर पत्राची प्रत देण्याचे नाकारले आहे.

न्यायालयात दोषारोप पत्र सादर केल्यानंतर त्यांच्या प्रती वादी यांना देण्यांत आलेलेल्या आहेत. त्यामध्ये आवश्यकती माहिती उपलब्ध आहे असे तपासी अधिकारी सपोआ श्री.परदेशी यांनीप्रतिपादन केलेले आहे व त्या आधारे प्रतिवादी यानी उत्तर दिलेले आहे. सदर उत्तर व सपोआ परदेशी यांचेशी चर्चा करुन माहिती घेता वादी यांना योग्य उत्तर देण्यांत आलेले आहे अशी आमची धारणा आहे."

वरील विवेचनाशी आयोग सहमत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आ दे श

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १५ डिसेंबर २००८

FILENAME \p E:\My Documents\December-2008.doc

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४८९ /०२

श्री. प्रकाश भास्कर पगारे ----- अपीलकार
बिल्डिंग अे-२ रुम नं.१२,
वरळी, पोलिस वसाहत वरळी,मंबई ४०० ०३०

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी पोलिस उपआयुक्त(प्रतिबंधक) ----- उत्तरवादी
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेशन विभाग
शिवाजी मंडई, पोलिस आयुक्तांचे कार्यालयख
मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे)
पोलिस आयुक्तांचे कार्यालय,मुंबई ४०० ००१

-विवेचन-

श्री. प्रकाश भास्कर पगारे यांनी त्यांची वेगवेगळी बिले मिळण्यास जो विलंब झाला त्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालय यांचेकडे दि.१६.४.२००८ रोजी माहिती मागितली होती. ही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी जे प्रथम अपिल केले होते.

त्या अपिलामध्ये ही सर्व माहिती देण्यांत येण्याबाबत तसेच ज्यांनी ही देण्यासाठी विलंब लावला त्यांच्यावर कार्यवाही होण्यासाठी आदेश सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहेत. हया आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे सदर व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केलेले आहे.

मात्र दि.२२.४.२००८ रोजीच्या पत्राने प्राप्त माहितीनुसार श्री.पगारे यांची माहिती एक वर्षाच्या कालावधीची असून सदर माहिती सादर करण्यासाठी जुन्या अभिलेखाची पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच सद्य:स्थितीत व्दितीय वर्ष २००७-२००८ रोजीचे दि.३१.३.२००८ रोजी पारीत झालेल्या देयकाचे धनादेश प्राप्त झालेले नाहीत. आजपर्यंत

१७९ पैकी १३६ धनादेश प्राप्त झाले असून ४३ धनादेश अद्यापही बाकी आहेत. सदर धनादेशाच्या नोंदी रोखपुस्तकात घेण्याचे काम प्राधान्याने करावयाचे असल्यामुळे सदर माहिती विहित मुदतीत सादर करणे शक्य होणार नाही, असे कारण दर्शवून जन माहिती अधिकारी यांनी एक महिन्याची मुदत वाढ मागितली. अर्जदारास दि.१४.१०.२००८ रोजीच्या पत्राने त्यांच्या सर्व बिलासंबंधी माहिती ही देण्यांत आलेली आहे. विलंबाची कारणे सुध्दा त्या पत्रामध्ये दर्शविण्यांत आलेली आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तात्कालीन प्रशासकिय अधिकारी श्री.उत्तम गौड यांच्या कार्यपध्दतीबाबाबत नाराजी व्यक्त करुन सहाय्यक पोलिस आयुक्त (प्रशासन) यांना प्राथमिक चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले होते व त्यानंतर अप्पर पोलिस आयुक्त यांनी श्री. गौड प्रशासकिय अधिकारी यांच्याबाबत दि.१७.११.२००७रोजी यांच्या कार्यपध्दतीबाबत नाराजी व्यक्त करणारे आदेश पारीत केलेले आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यपध्दतीत सुधारणा करावी अशीही अपेक्षा व्यक्ती केलेली आहे.

अर्जदारास त्यांच्या वेगवेगळया अपीलासंदर्भात माहिती देण्यांत आलेली आहे व यासंबंधीची माहिती देण्यास विलंब करणा-या अधिका-याविरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यांत आलेली असल्यामुळे व अपिलार्थी यांचे म्हणणे दि.१५ डिसेंबर रोजी झालेल्या व्दितीयअपली सुनावणीच्यावेळी समजून घेतल्यानंतर पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १५ डिसेंबर २००८

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**तक्रार क्रमांक २००८/ २२ /०२**

**श्री. एन.जे.लखाणाी ------ तक्रारदार**
**१/५४,९१ भुलाभाई देसाई रोड,**
**मुंबई ४०० ०२६**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी अपिलीय अधिकारी ---- उत्तरवादी**
**ट्रफिक पोलिस, मुंबई ट्रॅफिक पोलिस (मुख्यालय)**
**मुंबई -२५**

**-विवेचन-**

**श्री. एन.जे.लखाणी यांनी आयोगाकडे अशी तक्रार केलेली आहे की, जन माहिती अधिकारी, ट्रॅफिक पोलिस (मुख्यालय) यांना स्पीड पोस्टाने पाठविलेला माहिती अधिकाराखालील अर्ज स्विकृत न करता हे पाकिट तसेच अर्जदारास परत करण्यांत आले. याबाबत त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. अर्जदारांनी जन माहिती अधिकारी यांना पाठविलेला लिफाफा पहाता त्यावर " रिफ्यूज "असे लिहिलेले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी, ट्रफिक पोलिस (मुख्यालय)यांना असे निर्देश देण्यांत येत आहे की, या आदेशासोबत अर्जदाराचा लिफाफा जोडलेला आहे. त्या अर्जदारास माहितीचा अधिकार अधिनियमानुसार योग्य माहिती द्यावी**

**तसेच या आदेशाची प्रत स्पेशल आय. जी. मुंबई ट्रॅफिक पोलिस यांनाही देण्यांत येत आहे. त्यांनी हा लिफाफा त्यांच्या जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात स्विकृत न केल्या गेलयाबाबतचा अहवाल १० दिवसाचे आयोगास पाठवावा.**

**आ दे श**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**या पत्राची प्रत स्पेशल आय.जी. यांनाही कार्यवाहीसाठी पाठविण्यांत यावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**दिनांक १५ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त**

FILENAME \p E:\My Documents\December-2008.doc

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३३४२ /०२

श्री. हर्ष पिपालिया,
अे/७०२/७०३, ------- अपीलकार
राहूल अेन्क्कलोव्ह इमारत, काळे कॉलेज समोर
साईबाब नगर, बोरीवली (प),मुंबई ९२

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता ------- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, इमारत प्रस्ताव
आर/विभाग, कांदिवली (प)
मुंबई ४०० ०६७

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका, इमारत प्रस्ताव
आर/विभाग, कांदिवली (प)
मुंबई ४०० ०६७

-विवेचन-

श्री. हर्ष पिपालिया यांनी दि.५.३.२००८ रोजी आयोगाकडे जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.१६.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अर्जदाराला राहूल क्लासिक" B "wing साईबाबा नगर, बोरीवली(W) या बिल्डिंग मध्ये १०७ व २०७ यांचे Amalgamation हे मंजूर केलेल्या स्ट्रक्चरल प्लॅनप्रमाणे मंजूर केले आहे किंवा कसे याची माहिती पाहिजे होती.

अर्जदाराने या बिल्डिंगच्या फाईलमध्ये नंबर दिल्यानंतर अर्जदाराला असे कळविण्यांत आले की, त्यांनी सदरील नस्तीचे अवलोकन करुन त्यांना हवी ती कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावीत. अर्जदाराचे असे म्हणणे की, मला मंजूर प्लॅनप्रमाणे हे Amalgamation मंजूर आहे किंवा नाही या संदर्भात "होय" किंवा "नाही" या संदर्भात माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी असे सांगितले की, सदरील इमारतीचे इन्स्पेक्शन करुन घेण्यांत आलेले आहे व अर्जदाराला ज्या दोन प्लॅटचे Amalgamation संबंधी माहिती पाहिजे आहे याचे Amalgamation मंजूर करण्यांत आलेले आहे. मात्र इन्स्पेक्शन केलेल्या इतर काही प्लॅटच्या Amalgamation मंजूरी

देण्यांत आलेली नाही, अशा काही प्लॅटचे **Amalgamation** करण्यांत आलेले आढळून आले व त्याविषयी कार्यवाही चालू आहे. अर्जदाराला त्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत अशी मंजूरी कधी देण्यांत आलेली होती ही माहिती ५ दिवसांचे आंत त्वरीत कळवावी.

**<u>आ दे श</u>**

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी वर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक १६ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३३४० /०२

श्री. विजय के. मंथेना
हरयानवाला लेन, ------- अपीलकार
स्टेशन रोड, अब्दुला मैन्शन,
इमारत क्र.७, रम नं.३४,
कुर्ला (प),मुंबई ७०

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा ------- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम कार्यालय, बेस्ट डेपो समोर
एस.व्ही.रोड,पालीराम पथ, अंधेरी (प)
मुंबई ५८

जन माहिती अधिकारी तथा तथा आरोग्य अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम कार्यालय, बेस्ट डेपो समोर
एस.व्ही.रोड,पालीराम पथ, अंधेरी (प)
मुंबई ५८

-विवेचन-

अर्जदार श्री. मंथेना यांनी बी.एस.इ.एस.महापालिका रुग्णालयातील उपहारगृहासंबंधी सार्वजनिक माहिती अधिकारी वैद्यकिय अधिकारी के (पश्चिम) विभाग यांचे कार्यालयाकडून देण्यांत आलेल्या कलम ३९४,४१२,४७९ अंतर्गत दि.२४.१०.२००७ रोजीच्या पत्रानुसार माहिती पाहिजे होती. दि.२२.११.२००७ रोजी अर्जदारास माहिती देण्यात आली त्यांने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपिलाच्या आदेशात आधी दिलेली माहितीत एकच बदल आवश्यक आहे. काही सदरील जागेचा इमारत प्रस्ताव हा कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव यांनी मंजूर केला असे नमूद केले आहे. प्रत्यक्षात आराखडा महापालिका वास्तुशास्त्रज्ञांनी मंजूर केलेला आहे, हे सुधारणा करणारे पत्र अर्जदारास देण्यांत येईल असे नमूद करण्यांत आले आहे. अर्जदाराचे वरील अपिलाचे प्रयोजन असे वाटते की, अनुज्ञा पत्र देताना काही आवश्यक बाबीचे पालन करण्यांत आलेले नाही.

अर्जदारांना माहिती अधिका-याने त्यांच्या अर्जानुसार माहिती दिलेली आहे. तसेच अर्जदारांने संपूर्ण नस्तीचे अवलोकन केलेले आहे. हया गोष्टीच्या आधारे अर्जदाराना जिथे

कुठे त्रुटी राहून गेल्या आहेत असे वाटत असेल त्याबाबत  महापालिका आयुक्त यांच्याकडे तक्रार करावी.  माहितीच्या अधिकाराखाली त्यांना माहिती देणे व संपूर्ण नस्ती दाखविणे हया गोष्टी पुरेशा ठरतात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक  १६ डिसेंबर  २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३२५० /०२**

**श्री. सएफीउल्ला हवालदार खान,**
**११६, न्यू धोबीघाट, रजक सोसायटी -----अपीलकार**
**कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग,**
**कफ परेड, कुलाबा, मुंबई ०५**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ------- उत्तरवादी**
**(अति./निष्कासन)**
**कुलाबा विभाग, डी.डी.बिल्डिंग,**
**जुने जकात घर फोर्ट,मुंबई ४००० ०१**

**जन माहिती प्राधिकारी तथा तहसिलदार**
**(अति./निष्कासन)**
**कुलाबा विभाग, डी.डी.बिल्डिंग,**
**जुने जकात घर फोर्ट,मुंबई ४००० ०१**

**-विवेचन-**

अपिलार्थी सफीउल्ला हवालदार खान यांनी अपूर्ण माहिती मिळाली या कारणास्तव दि.२९.१.२००८ रोजी आयोगाकडे स्वाक्षरीविना व्दितीय अपील केले आहे. सदर अअपिलाची सुनावणी दि.२४.१०.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली होती. त्यावेळी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.४.१०.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या मालमत्तेतील जर त्रोटक कारवाई किंवा साफ सफाई व इतर कार्ये करावयाची असल्यास कोणामार्फत केली जाते याची संपूर्ण माहिती देण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१५.१०.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना असे कळविले आहे की, माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ चे कलम २ (च)" माहिती " त्यानुसार अपिलार्थीच्या अर्जात तशा प्रकारची माहिती मागितलेली नसल्याने अपिलार्थीना अर्ज निकालात काढल्याचे कळविले आहे.

अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नाही या कारणास्तव त्यांनी दि.१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. त्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने शासनाच्या मालकीच्या जागेवरील निष्कासित करावयाची अनधिकृत बांधकामची कारवइऱ्ा मुंबई महानगरपालिका संबंधित वॅार्ड विभाग, संबंधित पोलिस स्टेशन व प्रथम अपिलीय अधिका-यांच्या कार्यालयाकडून केली जात असे दि.१४.१.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीना कळविले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अपूर्ण दिली आहे असे नमूद करुन दि.२९.१.२००८ राजी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. सदर अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षकारांची बाजू ऐकन घेण्यांत आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता अपिलार्थीनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१४.१.२००८ च्या पत्रान्वये अपिलार्थीना अपेक्षित माहिती दिली असल्याच्या निर्णयाप्रत आयोग आले आहे. शिवाय आयोगाकडे प्राप्त झालेले दि.२९.१.२००८ चे व्दितीय अपिल स्वाक्षरीविना आहे. तेव्हा खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील फेटाळण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १६ डिसेंबर २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३२५१ /०२**

**श्री. सएफीउल्ला हवालदार खान,**
**११६, न्यू धोबीघाट, रजक सोसायटी -----अपीलकार**
**कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग,**
**कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ०५**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ------- उत्तरवादी**
**(अति./निष्कासन)**
**कुलाबा विभाग, डी.डी.बिल्डिंग,**
**जुने जकात घर फोर्ट,मुंबई ४००० ०१**

**जन माहिती प्राधिकारी तथा तहसिलदार**
**(अति./निष्कासन)**
**कुलाबा विभाग, डी.डी.बिल्डिंग,**
**जुने जकात घर फोर्ट,मुंबई ४००० ०१**

**-विवेचन-**

**अपिलार्थी सफीउल्ला हवालदार खान यांनी अपूर्ण माहिती मिळावी या कारणास्तव दि.२९.१.२००८ रोजी आयोगाकडे स्वाक्षरीविना व्दितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.२४.१०.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली होती. त्यावेळी अपिलार्थी प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलार्थी यांनी दि.४.७.२००७ च्या अर्जान्वये बृजलाल शिवनाथ प्रजापती व इतर ३ झोपडपट्टीधारक यांना ओळखपत्र देण्यांत आले किंवा नाही याची माहिती तसेच त्या व्यक्तींनी अर्जाबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जाव्दारे पुरावे सादर केले आहेत. त्या कागदपत्राच्या छायाप्रती देण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीनी माहिती देण्यास परवानगी दिल्यास सदर माहिती देता येईल असे दि.२०.७.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यानी अपिलार्थीना कळविले होते. तसेच दि.३.८.२००७ च्या पत्राने अपिलार्थीचा अर्ज निकालात काढल्याचे कळविले होते.**

**जन माहिती अधिका-यांच्या वरील पत्रान्वये अपिलार्थीचा अर्ज निकालात काढल्याचे कळविल्याने अपिलार्थीनी दि.२२.८.२००७ रोजी प्रथम अपिल केले.**

प्रथम अपिलाची सुनावणी दि.५.९.२००७ रोजी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी अअिपलार्थी उपस्थित होते. त्यांची बाजू अपिलीय अधिकारी यांनी ऐकून घेतली व दि.२०.९.२००७ रोजी असे आदेश पारित केले की, अपिलकर्त्याने मागणी केली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने त्या पक्षाकडून संमती प्राप्तहोताच अपिलार्थीना माहिती देण्याची तजविज ठेवली आहे.

त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने त्रयस्थ पक्षास माहिती देण्याविषयी विचारले असता त्यांचेकडून प्रतिसाद नाही. जर त्रयस्थ पक्षाकडून प्रतिसाद नसेल तर त्यांना यासंबंधी हरकत नाही असे गृहीत धरण्यांत यावे व अर्जदारात हवी असलेली माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत देण्यांत यावी.

आ दे श

अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांना वरील निर्देशांचे पालन करावे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १६ डिसेंबर २००८

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५१४ /०२

श्री. निपुण मठकर,
बी-५, जीवदानी कृपा चाळ, -----अपीलकार
रामचंद्र जाधववाडी,
विजय नगर,नालासोपारा (पूर्व)
ठाणे-४०१२०८

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती प्राधिकारी ------- उत्तरवादी
पर्यावरण विभाग,
१५ वा मजला, नविन प्रशासकिय भवन
मुंबई ४०० ०३२

-विवेचन-

श्री.निपूण मठकर, नालासोपारा यांनी आयोगाकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराने जे अपील केले होते त्या अपीलाच्या संदर्भात अपिलीय अधिकारी यांनी "अर्जदाराने व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जावे " असे दिनांक २६.६.२००८ च्या पत्राने कळविले आहे. त्यानुसार व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला श्री.निपुण मठकर यांनी माहिती घेऊन जाण्याचे मान्य केले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक १८ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५२२ /०२

श्री. ॲलेक्स रिबेलो
सेंट जोसेफ चर्च शाळा -----अपीलकार
विक्रोळी (प)मुंबई ४०० ०७९

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा संचालक ------- उत्तरवादी
(इएस ॲन्ड पी)
बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, विस्तार इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई ०१

जन माहिती प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता
(एमयुटिपी ब्रीज)
बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, विस्तार इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई ०१

-विवेचन-

श्री. ॲलेक्स रिबेलो यांनी आयोगाकडे दि.१८ ऑगस्ट २००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले होते त्या अपिलाची सुनावणी दि.१९.१२.२००८ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास Vikroli Railway Overbridge alignment बदलली जाण्यासाठी एमएमआरडी/बीएमसीचे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची नावे व पदनाम विचारण्यांत आली होती व त्याबाबत विस्तृतपणे माहिती अर्जदारास दिली आहे तसेच अर्जदारास असे कळविण्यांत आले की, सदरील काम हे MUTP चे अंतर्गत असून ते जागतिक बॅकेच्या सहाय्याने अंमलात आणण्यांत येत आहे. तेथील कामाचे Design Wilbur Smith Associates यांनी केले असून याबाबतचे सर्व निर्णय MMRDA/BMC ने जागतिक बॅकेशी सल्ला मसलत करुन घेतले आहे. यासंबंधीचे सर्व

रेकॉर्ड अर्जदारास हवे असेल तर तपासणीसाठी उपलब्ध आहे. त्यातील नोटींग्जवरुनहि अर्जदारास कल्पना येऊ शकेल की ही एकत्रितरित्या केलेली निर्णय प्रक्रिया आहे.

अशा प्रकारच्या प्रोजेक्टबाबत अमूक एका अधिका-यावर जबाबदारी निश्चित करणे कठीण असते व याबाबतीत कार्यालयातील सर्व कागदपत्र दाखविण्याची तयारी महापालिकेनेही दर्शविलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १९ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४१७ /०२

श्री.निलकंठ विनायक जोशी
व्दारा ः श्री. धनेश्वर व्ही. जैन
ब्लॉक नं. ४२६/४२७, ४ था मजला
सिध्देश्वर को-ऑप.हॉ.सोसायटी ------- अपीलकार
सिध्दार्थ नगर, अलियावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव नाजकधा-२
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नाजकधा-२
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ ------- उत्तरवादी

-विवेचन-

श्री. निळकंठ विनायक जोशी, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३)अन्वये आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपीलावर दि.३.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यांत आली. सुनावणीला अपीलकार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलकाराने नागरी जमीन कमाल धारणा कायद्यांतर्गत दुर्बलघटक घरबांधणी योजनेत भाईदर व मीरा रोड येथील विकासकाने केलेला गैरव्यवहार याबाबत विधानसभा तारांकित प्रश्न क्र.७५७९७ ला दिलेल्या उत्तरा संदर्भात एकूण ५ मुद्यांबाबत माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-यांनी विचारलेली बाब ही अधिनियमाच्या " माहिती " या संज्ञेनुरुप नसल्याचे नमूद करुन माहिती नाकारली. त्यामुळे अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी दरम्याने आवश्यकती माहिती देण्याचे जनमाहिती अधिका-यांना निर्देश दिले. त्यास अनुसरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराला माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने संबंधित शासन निर्णयाची प्रत दिली. मुद्दा क्र. २,३, व ५ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे व ती माहिती या संज्ञेत बसत नसल्यामुळे नाकारली. मुद्दा क्र.४ ची माहिती सक्षम प्राधिकारी, ठाणे नागरी समूह, ठाणे यांच्याकडून घ्यावी असे कळविले.

अपीलकाराने पुरविलेली माहिती त्रुटीयुक्त व अपुरी आहे. या कारणास्तव व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलामध्ये त्यांनी मुद्देनिहाय कारण नमूद केली आहेत.

अपीलकाराच्या म्हणण्यानुसार मुद्दा क्र.१च्या अनुषंगाने त्यांना प्राप्त झालेल्या शासन निर्णयामध्ये नमूद दोन परिपत्रकांच्या प्रती त्यांना मिळाल्या नाहीत. तथापि जन माहिती अधिका-यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार ही परिपत्रके देण्याची तयारी दर्शविली आहे. मुद्दा क्र.२ ची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराला दिलेली नाही मात्र आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये मात्र त्यांनी ही माहिती नमूद केली आहे. त्यावरुन मुद्दा क्र.२ ची माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांना काही अडचण नाही, असे दिसून येते. मुद्दा क.३ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी प्रश्नात/मुद्दयामध्ये विचारलेली बाब विचाराधीन वा सदर बाबीच्या अनुषंगाने कार्यवाही चालू असल्यास त्याबाबतची माहिती देण्यास जन माहिती अधिकारीना अडचण नसावी. अशी माहिती वा संबंधित कागदपत्रांच्या प्रती देणे शक्य नसल्यास तसे सकारण अपीलकारला कळवावे. मात्र प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली म्हणून माहिती नाकारणे या प्रकरणात योग्य होणार नाही. मुद्दा क्र.५ बाबतही ही बाब लागू होते.माहिती विशिष्ट विकासकासंदर्भात विचारलेली आहे. त्यामुळे त्याबाबत कार्यवाही चालू असल्यास त्याबाबतची माहिती अपीलकाराला उपलब्ध करुन देणे योग्यच आहे.

सबब वरील विवेचन लक्षात घेता,

१. मुददा क्र.१ संदर्भात जन माहिती अधिका-यांनी संबंधित परिपत्रकांची प्रत अपीलकाराला उपलब्ध करुन द्यावी.
२. वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.२.३ व ५ च्या अनुषंगाने जी सद्यस्थिती असेल त्याची माहिती अपीलकाराला उपलब्ध करुन द्यावी.

ही सर्व कार्यवाही जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आंत पूर्ण करावयाची आहे.

## आ दे श

अपील मान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ १९३८ /०२

श्री.श्री. व्ही. कृष्णन
कृष्णमणी, उत्तरानगर,
तपोवन रोड, पो.व्दारका कॉर्नर ------- अपीलकार
नाशिक ४२२०११

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विज पारेषण
क.लि.प्रकाशगंगा, प्लॉट क्र.सी १९ ई ब्लॉक,
वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे (पूर्व)मुंबई ४०० ०५१

जन माहिती अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक (एच.आर.)महाराष्ट्र
राज्य विज पारेषण क.लि. ------- उत्तरवादी
प्रकाशगंगा प्लॉट क्र.सी १९ ई ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

-विवेचन-

श्री. व्ही. कृष्णन, नासिक यांनी आयोगाकडे केलेल्या दि.२८.७.२००७ रोजी केलेल्या व्तिीय अपीलाची सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सींग व्दारा घेण्यांत आली. श्री. कृष्णन हे नासिक येथील व्हिडिओ कॉन्फरसिंग रुममध्ये उपस्थित होते.

श्री.कृष्णन यांना संपूर्ण राज्याच्या महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी मर्यादित यांच्या अंतर्गत येणा-या टेलिकम्युनिकेशन डिव्हिजनमध्ये काम करणा-या अभियंताना देण्यांत आलेली टेलिफोन रिअेम्बामेंट बिले, न देण्यांत आलेली बिले, ज्यांच्याकडून बीलांची वसूली करण्यांत आली अशा संबंधीची माहिती पाहिजे होती. त्यांना असे कळविण्यांत आले की, दूरसंचारण विभाग कार्यालये जरी महापारेषण कंपनी अंतर्गत कार्यरत असले तरी श्री.कृष्णन यांनी मागितलेली माहिती सन १९९८ पासूनची आहे व क्षेत्रिय कार्यालयाची माहिती मुख्य कार्यालयात उपलब्ध नसते. माहिती विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध असल्याने सदरची माहिती संबंधित दूरसंचार विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधुन प्राप्त करुन घेण्यास कळविण्यांत आले. या विरुध्द केलेल्यो अपीलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यांत आला व क्षेत्रीय कार्यालयांना अशाहि सूचना देण्यांत आल्या की, श्री.कृष्णन यांना अभिप्रेत असलेली माहिती तयार ठेवण्यात यावी व अर्जदाराचे मागणीनुसार देण्यांत यावी. श्री.कृष्णन यांच्या दि.८.६.२००७ च्या पत्राच्या छायांकित प्रती संबंधित दूरसंचार विभाग कार्यालयास पाठविण्यांत आल्या होत्या.

प्रत्येक कर्मचा-यांचे प्रदान विषयक देयके यांचे लेखा अंकेक्षण व देयके इत्यादिचे भुगतान कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत असतो त्या कार्यालयाकडून केली जाते. पर्यायाने संबंधित प्रकरणाबाबतचे सर्व दस्तऐवज त्याच कार्यालयात उपलब्ध असतात. श्री.कृष्णन ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या नासिक येथील दूरसंचार विभाग कार्यालयाने अशी माहिती अर्जदारास या आधीच पुरविली होती.

अर्जदाराची अशी समजूत दिसते की, मुख्यालयाला अर्ज केला की, ते सर्व विभागाकडून माहिती गोळा करुन अर्जदारास देतील, ही समजूत चुकीची आहे. जी माहिती मुख्यालय त्यांच्या सर्वसाधारण पध्दतीप्रमाणे सर्व विभागीय कार्यालयाकडून गोळा करीत असते ती माहिती मुख्यालयाकडून एकत्रित स्वरुपात मिळू शकते. इतर विभागीय माहिती ही त्या त्या कार्यालयाकडूनच घ्यावयाची असते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात बदल करावा असे आयोगास वाटत नाही.

## आ दे श

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २९ डिसेंबर २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३३३६ /०२**

**श्री.एस.एस.प्रभु**
**बी-२३,उद्यान प्रभा,**
**तेजपाल स्कीम रोड नं.२ --- अपीलकार**
**विलेपार्ले, (पूर्व),मुंबई ४०० ०५७**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)**
**प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, फोर्ट,**
**मुंबई ४०००0१**

**जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमलबजावणी-१)**
**प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, फोर्ट,**
**मुंबई ४०००0१ --उत्तरवादी**

-विवेचन-

अपिलार्थी डॉ.एस.एस.प्रभु यांनी मागणी केलेली माहिती प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.८.११.२००७ च्या आदेशानंतरही प्राप्त न झाल्याने फेब्रुवारी २००८ मध्ये आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२६.११.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली होती. त्यावेळी अपिलार्थी विद्यमान तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान व तत्कालीन प्रथम अपलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि.२०.२.२००७च्या अर्जान्वये मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-२ मुंबई यांच्या कार्यालयात दि.१६.१.२००७ रोजी शास्त्रीनगर व्दारका को-ऑप.हौ.सो.लि.ची चुकविलेल्या मुद्रांक शुल्काच्या सबंधाने माहिती अपेक्षिलेली होती. परंतू सदर माहिती प्रधान मुद्रांक कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीना दि.१८.७.२००७ व दि.७.८.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी कळविले.

अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीनी दि.६.८.२००७ रोजी प्रथम अपिल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने दि.८.११.२००७ च्या आदेशान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (ज)(एक)नुसार अपिलार्थीनी अपेक्षिलेली माहती पाहणीकरिता उपलब्ध करुन सदरचा माहिती छायांकित प्रतीसह त्वरीत उपलब्ध करुन देण्याचे आदेश पारित केले.

**प्रथम अपिलीय अधिका-याच्या दि.८.११.२००७ च्या आदेशानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झ ाल्याने आयोगाकडे फेब्रुवारी २००८ मध्ये व्दितीय अपील केले आहे. सदर अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दोन्ही पक्षकार उपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली तसेच आयोगाकडे सदर प्रकरणात उपलब्ध असलेली कागदपत्रे सुनावणीच्या दरम्यान संबंधित प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाची तपासणी केली. त्यावरुन असे दिसते की, अपिलार्थीनी अपेक्षिलेली माहिती संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने सदर कार्यालयाने मुल्यांकन करुन संबंधित संस्थेला दि.१.३.२००८ रोजी मागणी नोटीस पाठविली. तद्नंतर दि.५.१२.२००८रोजी उप मुद्रांक अधिक्षक यांना संस्थेचा अभिलेख तपासणीकरिता प्राधिकृत करण्यांत आले होते. तेव्हा अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आत अपिलार्थीना प्रकरणाच्या सद्य:स्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी द्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

## आ दे श

**अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनीवर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ डिसेंबर,२००८

 FILENAME \p  E:\My Documents\December-2008.doc

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३४७५ /०२

श्री.नरवंदा प्रसाद मिश्रा,
राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,
नर्मदा कृष्णा भवन, परेरा वाडी,
साकीनाका, मुंबई ------- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलीस उपायुक्त, (गुन्हे)
पोलिस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई-१

जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रतिबंधक)
पोलिस आयुक्तांचे कार्यालय, मुंबई-१

------- उत्तरवादी

-विवेचन-

श्री.नरवंदा प्रसाद मिश्रा,यांनी आयोगाकडे दिनांक १२.७.२००८ रोजी सादर केलेल्या अपिलाची सुनावणी दि.८.१२.२००८ घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला अपिलकर्ते यांनी असे सांगितले की, सदर प्रकरणामध्ये अप्पर पोलिस आयुक्त यांनी सह पोलिस आयुक्त यांना पत्र लिहून सदरील केसचा तपास दुस-या पोलिस निरिक्षक दर्जाच्या अधिका-याकडून करुन घेणे उचित ठरेल, अशा प्रकारचे पत्र सह पोलिस आयुक्त यांनी दिलेले होते. तसेच अर्जदारास सह पोलिस आयुक्त (गुन्हे) यांनी सह पोलिस आयुक्त कायदा व सुव्यवस्था यांना लिहिलेल्या २५ मार्च २००८ च्या पत्राची प्रत पाहिजे आहे व श्री. अनिल पोफळे, क्राईम बॅच यांनी केलेल्या इन्व्हेटीगेशनची प्रत पाहिजे आहे.

जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरील गोष्टीचा तपास पूर्ण झालेला नसल्यामुळे सद्य:स्थितीतील माहिती देता येत नाही. सदरील केसचा तपास पूर्ण न झाल्यामुळे सद्य:स्थितीतील माहिती देता येत नाही, हे म्हणणे जरी मान्य करता येत असले तरी या प्रकरणाच्या चौकशीमध्ये वरिष्ठांनी घेतलेली दखल लक्षात घेता, सदरील गोष्टीचा तपास संबंधित तपास अधिकारी यांनी त्वरीत पूर्ण करुन घेऊन अर्जदारास त्यानंतर शक्य तितक्या लवकर माहिती देण्याची कार्यवाही ही अप्पर पोलिस आयुक्त, उत्तर प्रादेशिक

**विभाग यांनी करावी असेही निर्देश देण्यांत येत आहेत. या आदेशाची प्रत अप्पर पोलिस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांनाही देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**संबधित अप्पर पोलिस आयुक्त यांनी या केसमध्ये वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी . तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यानंतर अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती द्यावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**

दिनांक ३१ डिसेंबर,२००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३०९५ /०२

श्री.अफजल शेख
साईबाबा सोसायटी न.३ रुम नं.डी/३
म्हाडा कॉलनी, मालवणी गेट क्र.८
मालाड (प), मुंबई ९५ ------- अपीलकार

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव नवि-११
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव नवि-११
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ . ------- उत्तरवादी

-विवेचन-

अपिलार्थी श्री. अफजल शेख यांच्या दि.१९.५.२००७ च्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने अपेक्षित माहिती न देता दिशाभूल केल्याचे नमूद करुन दि.२८.९.२००७ रोजी अपिलार्थीनी आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी आयोगाच्या कार्यालयात दि.१३.१०.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली असता, त्यावेळी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. परंतू अपिलार्थी सुनावणीच्या वेळी उपस्थित राहिले नाहीत.

अपिलार्थी यांनी दि.२९.५.२००७ च्या अर्जान्वये मुख्य अभियंता (विकास नियोजन)बृहन्मुंबई महानगरपालिका, यांचे अपिलार्थीना लिहिलेले पत्र क्र.सीएचई/१०५६/डीपीडब्ल्यूस/पी ॲन्ड आर/आरआयए-०५ दि.२७.२.२००७ च्या अनुषंगाने फेर माहिती मिळणेबाबत व त्यामध्ये नमूद केलेले न.भू.क्र.१४०६ए/३/९ मालाड (पश्चिम)व न.भू.क्र.८२७/१सी (भाग)मालाड (पूर्व)यांच्या फेरबदलाची माहिती मागविली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१३.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना भूखंडाच्या फेरबदलाबाबतची कारणे नमूद केलेली अधिसूचना दि.१०.११.२००८ ची प्रत पूर्वीच दि.९.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीना पाठविल्याचे कळविले. तसेच दि.९.३.२००७ च्या पत्रान्व्येही अधिसूचनेची प्रत पाठविली आहे.

जन माहिती अधिका-यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने दि.१९.५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.१०.९.२००७ रोजी आयोजित करण्यांत आली होती. परंतू त्यावेळी अपिलार्थी उपस्थित नव्हते. तेव्हा प्रथम अपिलाच्या

अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश पारित केले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च)मध्ये अपिलार्थीनी मागितलेली माहिती बसत नसलयाचे अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने व्यथित होऊन दि.२८.९.२००७ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले. व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित राहिले नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्राची सखोल तपसणी केली असता अपिलार्थीनी आयोगास लिहिलेले तसेच तत्कालीन मा.राज्यपालमहोदय, तत्कालीन मा.मुख्य मंत्री महोदय वतत्कालीन मा.उपमुख्य मंत्री व अन्य अधिकारी यांना पृष्ठांकित केलेले उपरोक्त विषयावरील दि.११.१.२००८ चे पत्र व अपिले मागे घेतल्याचे दि.५.२.२००८ च्या पत्रात नमूद केले आहे. सदर दि.५.२.२००८ च्या पत्रात विचाराधीन अपिलाचा उल्लेख आहे. तेव्हा सदर बाब तसेच अपिलार्थी स्वतः सुनावणीच्या वेळी उपस्थित राहिले नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नसल्याने सदर अपिलाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३२४२ /०२

श्री.रत्नाकरन कुभक्कुडी
मुकअंबीका सदनम कोलासंरी, बवूमभाम (पीओ)
थलासरा केरला ६७०११० ------- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव (दक्षता-२)
जलसंपदा विभाग, २ रा मजला,मंत्रालय,मुंबई

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (दक्षता-२)
जलसंपदा विभाग, २ रा मजला,मंत्रालय,मुंबई ------- उत्तरवादी

## -विवेचन-

अपिलार्थी श्री. रथनाकरन कुंबक्कुडी यांनी दि.२४.१.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी एक वर्षापूर्वी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दि.१.१२.२००६ रोजी सर्व संबंधित कागदपत्रासह जलसंपदा विभागातील दोन अधिका-याविरुध्द लाचलुचपतीबाबत तपशिलवार तक्रार केली होती. परंतू त्यावर काय कारवाई केली त्याबाबत त्यांना अवगत करण्यांत आले नाही. सदर प्रकरणात अपिलार्थीनी दि.८.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय यांच्याकडे अर्ज केला होता. तसेच दि.८.१२.२००७ रोजी प्रथम अपिल केले होते. परंतू त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी व्यथित होऊन आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२४.१०.२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात केली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. परंतू अपिलार्थी उपस्थित राहिले नव्हते.

अपिलार्थीनी दि.८.११.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अअधिकारी, मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय यांच्याकडून अशी माहिती मागविली होती की, त्यांचया दि.१.१२.२००६ च्या तक्रारीवर काय कार्यवाही केली. जर कार्यवाही केली नसल्यास, का कार्यवाही केली नाही,त्यांना उत्तर का देण्यांत आले नाही व अतिरिक्त कागदपत्रे /खुलासा कां मागविण्यांत आला नाही. सदर दि.८.११.२००७ चा अर्ज मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाने दि.२६.११.२००७ च्या पत्रान्वये जलसंपदा विभागाकडे योग्यत्या कार्यवाहीसाठी

पाठविल्याचे अपिलार्थींना कळविले होते. त्या अनुषंगाने जलसंपदा विभागातील जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थींचे दि.१.१२.२००६ चे वत्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध होत नसल्याने माहिती उपलब्ध करतायेत नाही असे दि.२६.१२.२००७ च्या पत्राने अपिलार्थींना कळविले.

जन माहिती अधिका-यांच्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थींनी दि.८.१२.२००७ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपिल केले. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी, जलसंपदा विभाग यांनी त्यांच्या दि.१४.१.२००८ च्या पत्राने अपिलार्थींना असे कळविले की, अपिलार्थींचे दि.१.१२.२००६ चे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. सदर पत्राची प्रत अपिलार्थींनी उपलब्ध केल्यास त्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देता येईल.

प्रथम अपिलीय अधिका-याच्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थींनी दि.२४.१.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपिल केले. सदर अपिलाच्या सुनावणीव्या वेळी अपिलार्थी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. परंतू सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेण्यात आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या संबंधित कागदपत्राची तपासणी करण्यांत आली, असे असले तरी अपिलार्थींची दि.१.१२.२००६ तक्रार प्रथम अपिलीय अधिका-याकडे उपलब्ध होत नसलयाने सदर प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

**आ दे श**

अपील फेटाळण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ डिसेंबर २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३३७६ /०२

श्री.संदिप गणेश आडागळे
सी.ई.एन.८८२/३९९,
गणेशमुर्ती नगर,भाग-२ ------- अपीलकार
कुलाबा, मुंबई ४०० ००५

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन)
आयुक्त दुग्धव्व्साय विकास यांचे कार्यालय,
प्रशासकिय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी, सीफेस, मुंबई ४०० ०१८

जन माहिती अधिकारी तथा जन संपर्क अधिकारी
आयुक्त दुग्धव्व्साय विकास यांचे कार्यालय,
प्रशासकिय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी, सीफेस, मुंबई ४०० ०१८ ------- उत्तरवादी

-विवेचन-

श्री. संदिप आडागळे यांनी दि.१८ फेब्रुवारी २००८ रोजी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१८.११.२००८ रोजी अपिलार्थीस संधी देण्याच्या देण्याच्या दृष्टीने पुन्हा दि.२०.१२.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली होती. परंतू अपिलार्थी दोन्ही वेळेला गैरहजर होते. प्रथम अपिलाच्या निर्णयात उपायुक्त प्रशासन तथा अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या मुद्दयाबाबत योग्यप्रकारे परामर्श घेतलेला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराची भोंगी ही समाजकंटकानी नष्ट केली असली तरी त्याबाबतची नुकसान भरपाई अर्जदाराकडून घेण्यासंबंधी निर्देश अर्जदारास मिळाले असल्यामुळे ते माहितीच्या अधिकारात सुध्दा माहिती घेण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसते. या संदर्भात दुग्धव्यवसाय विभागातर्फे असेहि सांगण्यांत आले की, याबाबतचा अंतिम निर्णय अजूनही झालेला नाही. माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश हे योग्य वाटतात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ डिसेंबर २००८

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ २५४३/०२**

**श्री.रामचंद्र आर.सिंग,**
**१२, तिरुपती अपार्टमेंट**
**देवीदयाल रोड, मुलूंड(प) -- अपीलकार**
**मुंबई. ८०**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसंचालक --उत्तरवादी**
**शिक्षण विभाग मुंबई,**
**जवाहर बालभवन यांचे कार्यालय,**
**चर्नी रोड (प),मुंबई.**

**जन माहिती अधिकारी थिा शिक्षण उपनिरिक्षक**
**बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**चेंबूर (पूर्व), मुंबई ७१**

-विवेचन-

श्री. रामचंद्र आर.सिंग, मुंबई यांनी माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर दि.७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्री. रामचंद्र आर.सिंग यांनी दयानंद वैदिक विद्यालय,मुलूंड ही शाळा अनधिकृतपणे संगणक फी व परीक्षा फी आकारत असल्यासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांच्याकडे माहिती मागितली होती. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सदर माहिती शिक्षण उपासंचालक,मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याविषयी अर्जदाराला कळविले. उपसंचालक (शिक्षण)मुंबई कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांकडून शालेय शिक्षण क्रीडा विभागाच्या पत्राच्या अनुषंगाने वर नमूद शाळेच्या मुख्याध्यापकावर काय कार्यवाही झाली याची माहिती न मिळाल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यानीही प्रथम अपीलावर आदेश पारित न केल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

तथापि अपीलकाराच्या माहिती अर्जातील विषयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.८.५.२००७ च्या पत्रान्व्ये अपीलकाराला सविस्तर माहिती दिलेली आहे व तयाची एक प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगालाही सादर केली आहे. म्हणजे अपीलकारांला माहिती पुरविण्यांत आली आहे हे स्पष्ट होते.

मात्र यापुढे जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जावर सत्वर व विहित मुदतीत कार्यवाही करण्याची व प्रथम अपीलीय प्राधिका-यानी  यांच्याकडे दाखल होणा-या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी. अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

अपीलकाराला जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आ दे श

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक  ३१ डिसेंबर  २००८

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**तक्रार क्रमांक २००८/ ५६/०२**

**श्री.राजाराम सखाराम काते,**
**अध्यक्ष, श्री. साई सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**आर.बी.चांदोरकर मार्ग, --तक्रारदार**
**आग्रीपाडा, मुंबई**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी सहाय्यक आयुक्त**
**(मालमत्ता) बृहन्मुंबई महानगरपालिका --उत्तरवादी**
**शिवाजी महाराज मंडई, फलटण रोड,मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
**(मालमत्ता) बृहन्मुंबई महानगरपालिका**
**शिवाजी महाराज मंडई, फलटण रोड,मुंबई ०१**

**-विवेचन-**

**श्री. राजाराम सखाराम काते, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीवर दि.२७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला उत्तरवादी उपस्थित होते. तक्रारदार उपस्थित नव्हते.**

**अर्जदारांनी आग्रीपाडा बी.वाय.टी. चाळ क्र.५ तळमजला येथे चालू असलेल्या पिठाच्या गिरणीसंदर्भात काही माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिका-याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने व प्रथम अपीलीय प्राधिका-याकडूनही उत्तर प्राप्त न झाल्याने अर्जदारांनी आयोगाकड तक्रार दाखल केली आहे.**

**तथापि अपीलकारांनी विचारलेल्या माहितीच्या विषयासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही झाली असल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेली तक्रार रद्द करण्यांत यावी, अशा आशयाचे लेखी निवेदन त्यांनी त्यांच्या दि.२८.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगास सादर केलेले आहे.**

**तक्रारदारानी तक्रार मागे घेतली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.**

**आ दे श**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
दिनांक ३१ डिसेंबर **२००८** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**